## -: प्रेसनोट दिनांक- १८/११/२०२१ :-

**श्री.गजानन आप्पासो माळी,वय-४६, पद-तलाठी, आलास व बुबनाळ,ता.शिरोळ,जि.कोल्हापूर,रा.१३/३५३, शिवाजीनगर,इचलकरंजी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत....**

---

यातील तक्रारदार यांनी एक महिन्यापुर्वी शेती गट कमांक १५६ मधील पाच एकर सातबा-यावर नोंद केलेले जयसिंगपूर उदगांव बॅकेचे कर्ज कमी करणेसाठी योग्य त्या कागदपत्रासह तलाठी कार्यालय, आलास याठिकाणी अर्ज सादर केला.त्यानंतर तक्रारदार यांनी यांचे मित्रास आपले सातबा-यावर नोंद असलेला जयसिंगपूर उदगांव बॅकेचा कर्जाचा बोजा कमी करून नवीन सातबारा उतारा देणेकरीता आलास गावचे तलाठी श्री माळी यांची भेट घेण्याकरीता पाठविले असता तलाठी श्री माळी यांनी तक्रारदार यांचे कामाकरीता तक्रारदार यांचे मित्राकडे १०,०००/-रू लाचेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दोन पंच साक्षीदारांचे समक्ष दि. ०३/११/२०२१ रोजी कॉग्रेस भवन जवळ, इचलकरंजी,ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथे आलास गावचे तलाठी श्री.माळी यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता, तलाठी माळी यांनी तक्रारदार यांचे सातबा-यावर नोंद असलेला जयसिंगपूर उदगांव बॅकेचा कर्जाचा बोजा कमी करून नवीन सातबारा उतारा देणेकरीता तक्रारदार यांचेकडे ७,०००/- रु. लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक श्री.गजानन माळी, तलाठी आलास व बुबनाळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर, रा.इचलकरंजी,ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे ,मा.श्री सुरज गुरव अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा.श्री सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, यांचे पर्यवेक्षणाखाली श्री.सतिश मोरे पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर, सहाय्यक फौजदार संजीव बंबरगेकर, पोना नवनाथ कदम, पोना सुनिल घोसाळकर,पोना.कृष्णात पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४. ५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

*Scanned by TapScanner*